पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address:** SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक २५/०६/२०१९

## जांभुळखेडा बॉम्बस्फोट प्रकरणात आणखी तिघांना अटक

- आता पर्यंत एकूण सात आरोपींना अटक करण्यात पोलीसांना यश

नक्षलवादयांनी दिनांक 1/05/2019 रोजी कुरखेडा पासुन 6 किमी अंतरावर असलेल्या मौजा-जांभुळखेडा ते पुराडा रस्त्यावर बॉम्बस्फोट प्रकरणात गडचिरोली पोलीस दलाने तपास चक्र फिरवुन नक्षलवादयांची दंडकारण्य स्पेशल झोनल समितीची सदस्या तसेच वेस्टर्न सब झोनल प्रमुख उप्पगुंटी निर्मलाकुमारी ऊर्फ नर्मदाक्का रा. कोडापावनुरु गलावरम मंडल जि. कृष्णा (आं.प्र.) व तिचा पती सत्यनारायण ऊर्फ किरण ऊर्फ किरणदादा याचेसह गडचिरोली पोलीसांनी अटक केली होती. दिनांक 19/06/2019 रोजी गडचिरोली पोलीस दलातील तपास पथकांनी तेलंगाणा राज्यामधील सर्च मधून लॅपटॉप, मोबाईल, पेनड्राईव्ह व इतर संशयित साहित्य जप्त करण्यात यश आले. या गुन्हयातील इतर आरोपीतांच्या सहभागाविषयी या दोन्ही जहाल नक्षलवादयांकडे विचारपुस केली तसेच इतर पुराव्याचे आधारे गडचिरोली पोलीस दलाने कुरखेडा तालुक्यातील मौजा लवारी येथील नामे 1) दिलीप श्रीराम हिडामी वय 22 वर्ष, 2) परसराम मंगाराम तुलावी वय 28 वर्ष यांना दिनांक 13/06/2019 रोजी अटक करुन पोलीस कोठडीत रवानगी करण्यात आली होती. त्यांची दिनांक 24/06/2019 रोजी पोलीस कस्टडी संपल्यानंतर मा. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी गडचिरोली यांचे समोर हजर केले असता मा. न्यायालयाने अधिक तपासासाठी दोन्ही आरोपीतांच्या पोलीस कस्टडी मध्ये 10 दिवसांची वाढ केली आहे. तसेच गडचिरोली पोलीस दलातील तपास पथकाने अटक करण्यात आलेल्या दोन्ही आरोपीतांकडे कसुन चौकशी केली असता घटनेत सहभागी असलेल्या आणखी 3 आरोपीतांची नावे निष्पन्न झाली. यावरुन गडचिरोली पोलीस दलाने दिनांक 23/06/2019 रोजी पुन्हा तीन आरोपी नामे 1) सोमनाथ दलसाय मडावी वय 38 वर्ष, 2) किसन सिताराम हिडामी वय 42 वर्ष, 3) सकरु रामसाय गोटा वय 35 वर्ष तिघेही रा. लवारी ता. कुरखेडा जि. गडचिरोली यांना अटक केली आहे. अटक आरोपीतांना दिनांक 24/06/2019 रोजी मा. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी गडचिरोली यांचे न्यायालया समोर हजर केले असता मा. न्यायालयाने तिन्ही आरोपीतांना 12 दिवस पोलीस कोठडी सुनावली आहे.

उपविभाग कुरखेडा अंतर्गत मौजा जांभुळखेडा येथे नक्षलवादयांनी घडवुन आणलेल्या भुसुरुंग स्फोट प्रकरणात गडचिरोली पोलीस दलाने अद्यापपर्यंत 07 आरोपीतांना अटक करण्यात मोठे यश प्राप्त केले आहे. घटनेचा पुढील तपास गडचिरोली पोलीस करीत आहे.